## निशाणी क्र. ८३ वरील आदेश

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा खारीज करण्यासाठी दाखल केला आहे. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. प्रकरणाचे अवलोकन केले असता जानेवारी २०२० पासून मार्च २०२२ पर्यंत प्रस्तुत प्रकरण वादीच्या पुराव्यासाठी नेमले असताना देखील वादी यांनी पुरावा सादर केला नाही ही वस्तुस्थिती आहे. सबब या कारणास्तव प्रतिवादींनी दावा खारीज करण्याची विनंती केली आहे. दिनांक ०४/०४/२०२२ रोजी वादीतर्फे मुखत्यार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. उपलब्ध अभिलेखावरुन वादी यांनी याकामी पुरावा देण्यास जवळपास दोन वर्षांचा विलंब केलेला आहे. मार्च २०२० पर्यंत व फेब्रुवारी २०२२ पासून न्यायालयाचे नियमीत कामकाज सुरु झालेले आहे. मार्च २०२० पर्यंत अगर फेब्रुवारी २०२२ नंतर एप्रिल २०२२ पर्यंत वादींनी पुरावा न देण्याचे कोव्हीड १९ चे कारण असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे या कालावधीमध्ये वादींनी पुरावा का दिला नाही याचे समाधानकारक स्पष्टीकरण देखील होत नाही. तथापि, वादीने पुरावा देण्यास इतका विलंब केला म्हणून हे प्रकरण खारीज करणे न्यायोचित वाटत नाही. कारण हा अर्ज दिल्यानंतर वादीतर्फे पुरावा सादर करण्यात आला आहे. उभय पक्षकारांमधील दावा मिळकती संदर्भात असलेले वाद मुद्दे गुणावगुणावर निवारण होण्यासाठी वादीला एक संधी देणे न्यायोचित वाटते. प्रतिवादींनी नमुद केलेल्या कारणास्तव हा दावा खारीज केल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमीत नुकसान होणार आहे. वादीने केलेल्या विलंबाच्या कारणास्तव प्रतिवादींचे नुकसान भरुन काढण्यासाठी वादींना जास्तीत जास्त खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब या कारणास्तव दावा खारीज करणे

योग्य वाटत नाही. परिणामी हा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

**आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत प्रस्तुत वादीने रुपये १,०००/–(रु. एक हजार फक्त) खर्चाची रक्कम जमा करावी, त्यापैकी रुपये ५००/– (रु. पाचशे फक्त) प्रतिवादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2022.06.08 17:43:35 +0530

स्थळ : कोरेगाव
दिनांक : ०८/०६/२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.